# पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी पुणे – १८

## माध्यमिक शिक्षण विभाग

### एकत्रित मानधनावर सहा.शिक्षक नेमणुका करणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष – २०२० -२०२१ साठी एकत्रित मानधनावर सहा.शिक्षक मराठी व ऊर्दु माध्यमाच्या शाळांसाठी सहा.शिक्षकांची आवश्यकता आहे.त्याकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हताधारकांकडून समक्ष अर्ज मागविणेत येत आहेत.

१) मराठी माध्यम-

आवश्यक पदे–८५

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे |
|---|---|---|
| १ | बी.एस्सी.बी.एड. | ३२ |
| २ | बी.ए.बी.एड. – इंग्रजी विषय | ०९ |
| ३ | बी.ए.बी.एड. – मराठी विषय | १३ |
| ४ | बी.ए.बी.एड. – हिंदी विषय | १२ |
| ५ | बी.ए.बी.एड. – भुगोल विषय | ०३ |
| ६ | बी.ए.बी.एड. – इतिहास विषय | ०३ |
| ८ | बी.पी.एड. ( क्रीडा प्रशिक्षक ) | १३ |

२) ऊर्दु माध्यम

आवश्यक पदे - २२

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे |
|---|---|---|
| १ | बी.एस्सी.बी.एड. | ०८ |
| २ | बी.ए.बी.एड. (उर्दु – भुगोल) | ०८ |
| ३ | बी.ए.बी.एड. (इंग्रजी – इतिहास) | ०६ |

अटी / शर्ती

१) एकत्रित मानधन शिक्षकांची नेमणुक ही आदेशाचे दिंनाकापासुन सहा महीने राहील,त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही.
तसेच नेमणुकी संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही.याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

२) एकत्रित मानधन रक्कम रूपये – १७,५००/- ( अक्षरी रक्कम रूपये सतरा हजार रूपये पाचशे रूपये फक्त) एवढे राहील,उमेदवारांना शालेय सुट्या वगळुन इतर सुट्या राहणार नाहीत.

२) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला,शैक्षणिक व व्यवसायीक अर्हताविषयक प्रमाणपत्र पदवीका बी.एड. पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक ,अनुभव इत्यादी कागदपत्राच्या सत्य प्रती सादर कराव्यात.

३) ज्या दिवशी माध्यमिक शिक्षण विभागास सदर सहा.शिक्षकांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवारांची सेवा संपृष्टात आणण्यात येईल या संबधीचे सर्व अधिकार माध्यमिक शिक्षण विभागाने राखुन ठेवले आहेत.

४) पात्र उमेदवारांना नेमणुक देताना आवश्यकतेनुसार शिक्षक संख्या कमी – जास्त करण्याचा अधिकार माध्यमिक शिक्षण विभागास राहील.

५) ऊमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात सहा.शिक्षक या पदासाठीचा अर्ज मा.अति.आयुक्त पिंपरी - चिंचवड महानगरपालिका यांच्या नावाने करावा.सदरचा अर्ज दि.०८/०९/२०२० ते१५/०९/२०२० अखेर सकाळी १० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत समक्ष पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्यकार्यालय पिंपरी -१८ येथे मुख्यकार्यालयाच्या प्रवेशव्दाराजवळ ठेवणेत आलेल्या बॉक्स मध्ये समक्ष टाकणेत यावेत.पोस्टाने/ कुरीयर ने येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही,याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. (सुट्यांचे दिवस वगळून)

६) निवड झालेल्या ऊमेदवारास एकत्रित मानधना व्यतिरीक्त कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थीक लाभ देय राहणार नाही. (उदा.दिवाळी बोनस तथा सानुग्रह अनुदान)

७) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित नमुण्यातील अर्ज / शैक्षणिक पात्रता धारण न

करणारे,तसेच नेमणूकीसंदर्भात दबाव तंत्राचा वापर केल्यास ऊमेदवारी अथवा निवड रद्द बादल व नियुक्ती झाल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

८) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

९) अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेच्या जाहीरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

१०) अपुर्ण माहिती व अटिची पुर्तता न करणा-या ऊमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील, याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

११) सदरची पदाची निवड ( सहा.शिक्षक ) ही पुर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरूपाची आहे,ऊमेदवारास मनपा. सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही.सदरचे पद हे शैक्षणिक वर्ष – २०२०-२०२१ या करीता आवश्यकतेनुसार राहील.

१२)उर्दुचे सहा.शिक्षकांना मनपाच्या कोणत्याही विद्यालयात कामकाज करावे लागेल,तसेच बी.ए.बी.एड.शिक्षकांना सर्व विषयाचे अध्यापनाचे कामकाज करावे लागेल.

१३) नियुक्तीच्या वेळी उमेदवारास रक्कम रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर (नोटराईज्ड करून) मनपा सेवेत भविष्यात नोकरी बाबतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही.याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या WWW.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर पाहता येईल.जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा.अतिरिक्त,आयुक्त(१) सो.यांचा राहील.

( संतोष पाटील )
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी पुणे – १८

जाहीरात क्र. ०१/२०२० दि. ०४/०९/२०२०
क्र. माध्य/शि/०१/कावि/४६०/२०२०
दि. ०४/०९/२०२०

## ऊमेदवाराने करावयाचा मराठी व ऊर्दु माध्यम अर्जाचा नमुना

मराठी / ऊर्दु

प्रति,

मा.अतिरिक्त आयुक्त,

माध्यमिक शिक्षण विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी पुणे – १८

फोटो

**विषय** – सन २०२० – २१ या शैक्षणिक वर्षाकरीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांची नेमणूकीबाबत

**संदर्भ** – जाहीरात क्र. दि. /०९/२०२० प्रसिध्द झालेली जाहिरात

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी एकत्रित मानधनावर माध्यमिक शिक्षण विभागात तात्पुरत्या स्वरुपात सहा.शिक्षक या पदाकरीता आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

1) संपूर्ण नाव - ______ (आडनाव) ______ (स्वतःचे नाव) ______ (वडिलांचे/पतीचे नाव)

2) पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह – ____________________

3) मोबाइल नंबर- | | | | | | | | | | |

4) जन्मतारीख - | | | | | | | | |

5) लिंग स्त्री / पुरुष

6) जात - प्रवर्ग –

७) मुख्य विषय - १ - २ -

7) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल –

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | विषय | | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण | एकुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बी.ए./ बी.एस्सी | | | | | | |
| २ | बी.एड. | | | | | | |
| ३ | बी.पी.एड. | | | | | | |

* पर्सेंटाईल गुण असणा-या उमेदवारांनी संबंधीत विद्यापिठाची शेकडा गुणांची प्रमाणित प्रत जोडावी,सदर प्रत नसेल तर अर्ज बाद केला जाईल.
* शैक्षणिक अर्हतेत चुकीचा पर्याय खोडावा.
* अनुभवाचे प्रमाणपत्र जोडावे.

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करते/करतो की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे एकत्रित मानधन नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला विश्वासु

स्थळ –

स्वाक्षरी

दिनांक - /०९/२०२०

अर्जदाराचे नाव ( )

टिप – आवश्यक कागदपत्राव्यतिरीक्त अनावश्यक कागदपत्रे जोडु नये.